नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र. ३५७**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १८ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - विजय बाबुराव धाडे,

वय - ४५ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. माझी शेती म्हैसवाडी शिवारात कोरवाड येथे आहे. ती शेती चार एकर तेरा गुंठे आहे. ती शेत गट क्र.४७ मध्ये आहे. सन २०२२-२३ मध्ये मी माझ्या शेतात कापूस पेरला होता. त्यावर्षी ३३ क्वींटल ९० किलो कापूस झाला होता. तो कापूस मी रमेश पाटील याला विकला होता. तो व्यवहार अर्धे पैस नगदी व अर्धे पैसे चाळीस दिवसाने देण्याचे ठरले होते. त्याचा भाव नऊ हजार रूपये प्रति क्वींटल असा ठरला होता. तो कापूस मी दि.२० जुलै २०२३ रोजी विकला होता. मला व्यवहारापोटी दीड लाख रुपये मिळाले होते. पुढे मला बाकीचे पैसे मिळाले नाही. त्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार केली. ज्याला मी कापूस विकला होता तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. त्याला मी ओळखतो. मी त्याच्या कामाला असल्यामुळे मी त्याला ओळखतो.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ व ११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस.जगताप याचंचेमार्फत सुरु....</u>**

०२. उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६.	उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस. मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७.	पैसे मिळाले नाही म्हणून मी पंधरा दिवसांनी पोलीस तक्रार केली होती. तक्रार लेखी होती की कशी होती हे मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी जबाब दिला होता. शेत माझ्या वडीलांच्या नावे आहे. माझ्या वडीलांची कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यात व आरोपीमध्ये पैशाच्या कारणावरून वाद झाला होता. माझ्यात व आरोपीमध्ये कोणताही लेखी करारनामा झाला नव्हता. माल मोजल्याच्या पावत्या माझ्याकडे उपलब्ध नाहीत. तो तथाकथीत माल आयशर गाडीतून नेला होता गाडीचा क्रमांक वगैरे मला सांगता येणार नाही. त्यावेळी कापसाचा बाजार भाव सहा हजार सातशे इतका होता. मी आरोपीविरुध्द नोटीस किंवा दिवाणी दावा दाखल केला नाही. मी जबाब १९ किंवा २० तारखेला दिला होता महिना सांगता येणार नाही. मला पैसे हे वीस दिवसानंतर मिळाले होते. करारनामा करतेवेळी साक्षीदार हजर होते. मी त्यांचे नाव पोलीसांना सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, कामाच्या कारणावरून पैशाचा वाद झाल्यामुळे व तसेच नंतर आरोपी हा सदर गुन्हयात आरोपी झाल्याचे समजल्यामुळे मी त्याच्याविरुध्द पोलीसांना खोटा जबाब दिला. आरोपीने जो तथाकथीत माल नेला तो स्वतःसाठी नव्हता तो एजंटसाठी नेला. मी तो माल कोणी नेला, कोठे नेला असे पोलीसांना सांगितले होते. मी पोलीसांना दिलेला जबाब वाचला होता. त्या जबाबात तो माल कोणी नेला व कोठे नेला हे लिहीले होते. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८.	उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

०९.	उलटतपास नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.01.03 16:58:21 +0530

दिनांक : ०३/०१/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर